# किनेकोने जपली सामाजिक बांधिलकी

## ■ रौप्यमहोत्सवी कार्यक्रमाचा निधी दिला मुख्यमंत्री कोविड-१९ रिलिफ फंडसाठी



**पणजी** : पिळर्ण, गोवा स्थित किनेको लिमिटेडने सोमवारी रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे केले. गोमंतकीय उद्योजक शेखर सरदेसाई यांनी दि. २५ मे १९९५ रोजी गोव्यात एक लहानसे आस्थापन सुरू केले. त्याच लहानशा रोपट्याचा वेलू गगनावर गेला आहे. आजच्या घडीला किनेको ही कंपोझिट्सच्या क्षेत्रात अग्रमानांकित असलेली वैशिष्ट्यपूर्ण कंपनी आहे, जिचा विस्तार संरक्षण, एअरोस्पेस, रेल्वे आणि औद्योगिक क्षेत्रांत आहे.

किनेकोच्या यशोशिखराचा रौप्यमहोत्सव, हितचिंतक आणि समभागधारकांसाठी मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याचे ठरवले होते. पण, कोविड-१९ या संकटाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या कार्यक्रमावर केला जाणारा सर्व निधी मुख्यमंत्र्यांच्या कोविड-१९ रिलिफ फंडसाठी आणि आरोग्य साधनसुविधा निर्माण करण्यासाठी राज्य सरकारला देण्यात आला आहे.

करोना महामारीच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक अंतर राखण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी हाच रौप्यमहोत्सवी कार्यक्रम किनेको कुटुंबीय असलेल्या कर्मचारी व सहयोग्यांसह ऑनलाइन घेण्यात आला. हा कार्यक्रम किनेकोच्या तीन्ही - संरक्षण आणि औद्योगिक, किनेको कमान (यूएसमधील कमानसोबत जॉइंट व्हेंचर) व रेल्वे विभागात घेण्यात आला. एकूण १२० जणांनी या व्हर्च्युअल कार्यक्रमात भाग घेतला.

या पंचवीस वर्षांच्या प्रवासात कंपनीने जे टप्पे पादाक्रांत केले, त्या टप्प्यांचा विस्तृत आलेख एका चित्रफितीद्वारे घेण्यात आला. अगदी प्रारंभी जेव्हा कंपनीचे पूर्वाश्रमीचे नाव मास किनेमॅटिक्स इंक होते, तेव्हापासून आत्तापर्यंतचा प्रवास पाहताना सर्व भारावून गेले होते. ते मंत्रमुग्ध करणारे क्षण पुन्हा जगता आले. पूर्ण केलेल्या सर्व ऑर्डर, त्यासाठी घेतलेले कष्ट या सर्वांचे पुनरावलोकन या निमित्ताने झाले ते क्षण पुन्हा एकदा जगता आले. अर्थव्यवस्थेला आकार देणाऱ्या महत्त्वाच्या क्षेत्रामध्ये औद्योगिक स्थान मिळवताना स्वत:ला सिद्ध करताना, संरक्षण, एअरोस्पेस, रेल्वे आणि औद्योगिक क्षेत्रांत यशोशिखरे पादाक्रांत करताना पाहता आले. २०१२ साली अमेरिकेतील कमान एअरोस्पेस ग्रुपशी संयुक्त उपक्रम उभा करताना यशाला एक वेगळीच झळाळी प्राप्त झाली.

यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक शेखर सरदेसाई म्हणाले की, आम्ही जपलेली मूल्ये, प्रामाणिकपणा आणि सचोटी या जोरावर कंपनीने ही भरारी मारली आहे. आमच्या भागीदारांनी आपली अमूल्य साथ आम्हाला दिली. किनेको कुटुंबातील प्रत्येकाने आपले योगदान पूर्णत्वाने दिले, जे कुठल्याही कंपनीच्या यशासाठी आवश्यक असते, त्यामुळे किनेको या रौप्यमहोत्सवी यशोशिखरावर स्वार झाली आहे, असेही सरदेसाई म्हणाले.

> पंचवीस वर्षांपूर्वी जे एक बीज पेरले होते त्याचा महावृक्ष झालेला पाहताना कृतकृत्य वाटते. दुर्दम्य आशावाद, प्रचंड मेहनत आणि कधीही हार न मानणारी जिद्द या जोरावर किनेकोने आपली मुळे खोलवर रुजवली आहेत.
>
> — **शेखर सरदेसाई**, संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक, किनेको